
चार्ली चॅपलिन कोण होते?



पेट्रीसिया बर्नान


चार्ली चॅपलिन कोण होते?



पेट्रीसिया बर्नान

मराठी : अश्विनी बर्वे

अनुक्रमणिका



चार्ली चॅपलिन कोण होते?

१९००च्या दशकाच्या सुरुवातीला, अमेरिकातले चित्रपटगृहे हास्याने भरून गेले. हे सगळे मोठ्या पडद्यावरील एका मजेदार छोट्या मुलामुळे झाले. त्याची विजार आणि बूट खूप मोठे होते. त्याची टोपी आणि कोट खूप छोटे होते.

तो दोन्ही पाय बाहेर फाकवून एका विचित्र पद्धतीने चालत असे. आणि त्याचे डोळे मोठे होता आणि तों आपली लहान मिशी हलवत असे.तेव्हा प्रेक्षक हे बघण्याची वाट बघू शकत नसत की पुढे तो कोणत्या संकटात सापडणार आहे. त्या अभिनेत्याला "लिटिल ट्रैम्प" म्हणत असत.


त्या मिशांच्या मागे अभिनेता चार्ली चॅपलिन होते. त्यांनी "लिटिल ट्रॅम्प" चा आविष्कार केला. चार्लीने आपल्या सिनेमांचे लेखन स्वतः केले आणि त्यांनी दिग्दर्शित केले. "लिटिल ट्रॅम्प" नेहमी गरिबीत राहत असे आणि बेरोजगार असे. पण चार्ली स्वतः जगातील सगळ्यात अधिक पैसे घेणारे अभिनेता होते. आणि सगळ्यात प्रसिद्ध सुद्धा. त्यांनी पडद्यावर एक शब्दही न बोलता सगळं काही मॅनेज केलं.

तो मूक चित्रपटांचा काळ होता. तेव्हा पडद्यावर कोणताही आवाज येत नसे. संशोधकांनी अजूनपर्यंत चित्रपटासाठी आवाज रेकॉर्ड करण्याची पद्धत शोधून काढली नव्हती. त्याशिवाय, अभिनेता खाणाखुणा आणि चेहऱ्यावरील हावभावांनी गोष्ट सांगत असत. यात चार्ली चॅपलिन इतके उत्तम कोणीही नव्हते.

खरंतर त्यांचे पडद्यावरचे जीवन हास्याने भरलेले होते.पण चार्ली यांचे खरे जीवन तसे नव्हते. त्यांचे लंडनमधील बालपण हृदय पिळवणारे होते. त्यांच्या वडिलांनी कुटुंब सोडले होते आणि त्यांची आई मानसिक रुग्ण असल्या कारणाने मुलांची देखभाल करू शकत नव्हती. तरीही इतिहास चार्लीचे हास्य लक्षात ठेवतो. ते चित्रपटात अग्रणी अभिनेता होते त्यांनी अमेरिकेच्या आणि जगातल्या लोकांना गुदगुल्या केल्या आणि हसवलं.

अध्याय १

गरिबी



अमेरिका ती जागा होती जिथं चार्ली प्रसिद्ध झाले. पण इंग्लड त्यांचे पहिले घर होते. चार्ल्स स्पेंसर चॅपलिनचा जन्म १६ एप्रिल १८८९ ला लंडन मध्ये झाला होता. त्याचा सावत्र भाऊ, सिडनी, त्याच्यापेक्षा चार वर्षाने मोठा होता.

ही आश्चर्याची गोष्ट नाही की चार्ली मोठा होऊन अभिनेता झाला. त्याचे आई-वडील दोघेही मनोरंजन क्षेत्रात होते.

ते इंग्रजी संगीतसमुहात आपली कला सादर करत असत, जिथे ते नाटक, गाणी आणि नृत्याबरोबर कॉमेडी शो करत असत. चार्लीचे वडील एक सफल अभिनेता आणि गीतकार होते. त्याची आई एक गायिका होती.

चार्ल्स चॅपलिन सीनियर सहज आणि आकर्षक होते, पण त्यांना दारू पिण्याची वाईट सवय होती. म्हणून कोणीही त्यांच्यावर जास्त भरोसा ठेवत नसे. जेव्हा चार्ली एक वर्षाचा होता, तेव्हा त्याच्या वडिलांनी आपली गाणी घेतली आणि त्यांनी घर सोडले.


चार्ल्सच्या आईने हन्नाने आपल्या दमावर सगळं काही केलं जे त्यांना करणं शक्य होतं. ती लहान आणि नाजूक होती.तिचे केस इतके लांब होते की ती त्यांच्यावर बसू शकत असी. अर्थात तिने आपल्या कठीण काळात मोठी हिंमत दाखवली. नोकऱ्या आल्या आणि गेल्या पण पैशांची तंगी कायम राहिली.



हन्ना चॅपलिन

संगीत हॉल

संगीत हॉल विभिन्न प्रकारच्या कलांचे लाइव्ह शो करत असत. तिथं कलाकार हवेत उडत. वेंट्रिलोक्विस्ट एखाद्या डमीच्या माध्यमातून गप्पा मारत असत. गायक आणि नर्तक सादरीकरण करत. तिथं उंच दोरीवरून चालणारे,प्राण्यांना शिकवणारे आणि ताटली हवेत फेकणारे आपली करामत दाखवत असत. त्या सगळ्यात लोकप्रिय कॉमेडी शो होता.



अमेरिकेत, संगीत हॉलला को वाडेविल थिएटर म्हटले जाते. वाडेविल १९०० च्या सुरुवातीला सगळ्यात लोकप्रियहोते. एकदा जेव्हा सिनेमे लोकप्रिय होऊ लागले, तेव्हा संगीत हॉल आणि वाडेविल हळूहळू काळाच्या मागे पडले.



एका रात्री, हन्नाचे गायन करियर अचानक समाप्त झाले. एका गाण्याच्यावेळी त्यांचा आवाज अचानक फाटला. गर्दीने आरडाओरडा करून हन्नाला रंगमंच्या वरून बाहेर काढलं. परंतु चतुर व्यवस्थापकाने हनाच्या जागी त्वरित चार्लीला रंगमंचावर ढकलून दिलं. चार्ली फक्त पाच वर्षाचा होता. पण तो वर्षानुवर्षे मंचाच्या मागून बघत होता. ती सगळी गाणी त्याला तोंडपाठ होती.




तरी पण चार्लीचे छोटेसं घर काही काळ खुश होते. जसा चार्ली उभा राहायला लागला तसे हन्नाने त्याला नृत्य करायला शिकवलं. आपल्या मुलाचे मनोरंजन करण्यासाठी, हन्ना आपल्या सूटकेसमधून वेशभूषा आणि विग काढत असे. आणि त्या नाटकांचा अभिनय करत असे जे तिला तोंडपाठ होते.



जसे छोट्या मुलाने गाणं आणि नाचणं सुरु केलं,गर्दी एकदम शांत झाली. लवकरच प्रेक्षक हसू लागले आणि त्याचा जय जयकार करू लागले. मग त्यांची मंचावर पैसे फेकले. चार्लीने गाणं मध्येच थांबवलं आणि पैसे गोळा करू लागला. ते बघून गर्दी अजून जोरात हसू लागली.

चार्ली एकदम हिट झाला. खरंतर हन्नाचे करियर संपले होते आणि तिने परत कधी गाणं म्हटलं नाही. “त्या रात्री माझा पहिला शो होता,” चार्लीने नंतर लिहलं, “आणि आईचा शेवटचा शो होता.”

परिवार गरीबीत बुडू लागला. हन्नाने शिवणकाम करून पैसे मिळवू लागले, पण ते पैसे पुरेसे नव्हते. हन्नाने आपल्या मुलांसाठी कपडे शिवण्यासाठी नाटकातील जुने कपडे कापून शिवले. भाड्याचे पैसे न दिल्याने चॅपलिन परिवाराला परत परत घर बदलावे लागत असे. सुरुवातीला ते तीन खोल्यांच्या घरात राहत असत.मग दोन खोल्यांच्या घरात गेले. शेवटी ते एका घाणेरडा वास येणाऱ्या लोणच्याच्या कारखान्याच्या मागे एका छोट्या खोलीत राहू लागले.



काळाच्या ओघात हन्ना खूप अशक्त आणि आजारी झाली. मग ती आपल्या मुलांना घेऊन "वर्कहॉउस“ मध्ये गेली. लंडनमध्ये गरीब लोकांसाठी हेच अंतिम ठिकाण होते. "वर्कहॉउस" एक प्रकारे अनाथालय होते.


त्यामुळे छोटा परिवार विखरून गेला. हन्नाला एका दवाखान्यात ठेवलं, तो अशा आजारी माणसांसाठी होता जे "वर्कहॉउस“ मध्ये राहण्यासाठी आणि काम करण्याठी असमर्थ होते. चार्ली आणि सिडनीला बेघर मुलांच्या शाळेत नेलं गेलं. ज्याला "हैनवेल“ म्हटलं जाई. चार्ली आपल्या मोठ्या भावाला घट्ट चिटकून राहिला. पण सिडनीला मोठ्या मुलांच्या वॉर्डात राहावे लागले. चार्लीने नंतर लिहले की त्याचे लहानपण त्याच क्षणी संपले. त्यावेळी तो फक्त सात वर्षांचा होता.

अनाथासाठी "हैनवेल“ शाळा



इंग्लिश वर्कहाउस

चार्लीच्या लहानपणी, जे गरीब लोक बिलाचे पैसे भरू शकत नसत, त्यांना "वर्कहाउस" मध्ये पाठवलं जाई. जर ते सक्षम असतील तर त्यांना तिथं राहण्यासाठी आणि जेवणासाठी काम करावं लागत असे. पण चॅपलिन परिवार वेगळा झाला आणि ते दिवसातून एकदाच थोड्यावेळासाठी भेटत असत.





सगळेजण गणवेश घालत आणि मोठ्या डारमेट्री मध्ये झोपत, आणि मोठ्या हॉल मध्ये बाकड्यावर बसून खात असत. कोणालाही "वर्कहाउस" मध्ये भरती होण्याची इच्छा नसे. तरीही "वर्कहाउस" ने अनेक लोकांना रस्त्यावर भुकेले होऊन मरण्यापासून वाचवले.

"हैनवेल" चे शिक्षक कडक होते. ते मुलांना शिक्षा देण्यासाठी वेताच्या काठीचा उपयोग करत.एकदा चार्लीला खोडकर मुलांनी तक्रार करू नये म्हणून वेताने मारलं होतं. उजवा हात लिहल्याने त्याला उलट्या हातावर पण मारलं होतं. पोटात जंत झाले म्हणून त्याच्या डोक्यावरील सगळे केस काढून टाकले तेव्हा चार्ली स्फुंदून स्फुंदून रडला.

दिवसा स्वप्नं बघण्याच्या आपल्या सवयीमुळे चार्ली त्या स्थितीतून बाहेर आला. आपल्या आत्मकथेत चार्लीने लिहलं : “तसं तर मी खूप गरीब होतो पण असं दाखवायचो की मी खूप श्रीमंत सन्मानीय व्यक्ती होतो."

कोणत्याही गोष्टीपेक्षा चार्ली, गरीबीपासून लांब राहू इच्छित होता. काळाबरोबर आपल्या अभिनयाच्या कौशल्यावर चार्ली झोपडीतल्या जीवनातून बाहेर आला. मग लवकरच त्याला पहिली नोकरी मिळाली.

अध्याय दोन

स्टेजवर

१८९८च्या पानगळीत,कायद्याने चार्लीच्या वडिलांना पकडलं आणि मग त्यांना आपल्या मुलांबरोबर राहावे लागले. तुम्हांला कदाचित वाटेल की चार्लीला "वर्कहाउस“ च्या तुलनेत हे आवडलं असेल. पण चार्लीने म्हटलं की आपल्या वडीलांबरोबर दोन महिने राहण्याच्या तुलनेत "वर्कहाउस" एक "लॉलीपॉप" सारखे होते. चार्लीचे वडील एका अशा महिलेसोबत राहत होते जी चार्ली आणि सिडनीला आपल्या जवळ ठेवू इच्छित नव्हती. जेव्हा त्यांचे वडील दूर जात, तेव्हा त्यांची सावत्र आई मुलांना घराच्या बाहेर काढत असे. कधी कधी चार्ली आणि त्याचे भाऊ अनोळखी लोकांच्या दरवाज्यासमोर झोपावे लागत असे किंवा गल्लीत झोपावं लागे.



शेवटी हन्ना दवाखान्यातून बाहेर आली आणि तिने आपल्या मुलांना वाचवलं. त्यानंतर मुलं कधीही आपल्या वडिलांबरोबर राहिले नाहीत. तीन वर्षानंतर, चार्ल्स सीनियरचा वयाच्या अडतिसाव्या वर्षी दारू पिऊन मृत्यू झाला.

चार्लीला आता शाळेत दाखल केलं होतं. पण तो फार कमीवेळा शाळेत जात असे. १८९८ हे त्याचे शाळेचे शेवटचे वर्ष होते. तो केवळ नऊ वर्षांचा होता.

तो नेहमी शाळेत न जाता काही पैसे मिळवण्याचा प्रयत्न करत असे. तो नेहमी एक बैरल ऑर्गन वाजवणाऱ्या संगीतकारासाठी नाचत असे. मग वाटसरू कलाकाराच्या टोपीत पैसे फेकत असत.



एका दुपारच्या वेळी एका चांगले कपडे घातलेल्या व्यक्तीने त्याचे नृत्य बघितले. ती व्यक्ती, विलियम जॅक्सन, मुलांच्या एका ग्रुपचा इनचार्ज होता. ती मुलं लंडनच्या आसपासच्या संगीत हॉलमध्ये नृत्य करत असत. त्यांना "ऐट लंकाशायर बॉयज“ म्हटलं जाई. आत्ता, जॅक्सनकडे फक्त सात मुलं होती. चार्लीत त्याला आठवा मुलगा मिळाला. हन्नाच्या परवानगी नंतर चार्लीने आपलं पहिलं खरं काम सुरु केलं.

चार्लीला वाटलं की जसा त्याने जॅकपॉट जिंकला.लंकाशायरचे चार मुलं मिस्टर आणि मिसेस जॅक्सनची आपली मुलं होती. पण ते दयाळू दांपत्य सगळ्या नाचणाऱ्या मुलांना आपला परिवार मानत असत. आता चार्लीकडे राहण्यासाठी एक खोली होती. जेवण मोफत होते. आणि तो एक डॉलर आठवड्याला कमवत असे. जे तो आपल्या आईला पाठवत असे.

मुलांना खूप कष्ट करावे लागत असत. "क्लॉगर" नर्तक एकमेकांच्या खांद्याला पकडत असत आणि त्यांचे पाय संगीताच्या तालावर हवेत उडत असत.

शोच्या रात्री, नाचणाऱ्या मुलांना घोडागाडीत भरून एका संगीत हॉलमधून दुसऱ्या संगीत हॉलपर्यंत नेले जात असे.





त्या नृत्य समूहाबरोबर दोन वर्षे काढल्यानंतर चार्लीची आई त्याला घरी घेऊन आली. तिला आपला मुलगा थकलेला वाटला. चार्लीने काम करणे बंद केले नाही. तो नेहमी चित्रविचित्र काम करत असे. त्याने एका नाव्हाच्या दुकानात, एका डॉक्टरच्या ऑफिसमध्ये आणि एका स्टेशनरीच्या दुकानात काम केलं. तो एका प्रिंटर आणि एका ग्लास–ब्लोअरचा सहाय्यक झाला. काही वर्षानंतर या कामांची झलक चार्लीच्या सिनेमांमध्ये दिसली."

चार्लीला इतर कामे पण आवडत असत. विशेषकरून विदुषकाचे आणि हास्य कलाकाराचे. ते म्हणतात, "त्यांच्या भूमिका माझ्या डोक्यात पक्क्या बसल्या होत्या."

"जेव्हा मी घरी जात असे, तेव्हा ते सगळं करण्याचा मी प्रयत्न करत असे." चार्ली जादू करायला आणि एक्रोबैटिक स्टंट करायला शिकला.



तरीही घरात पुरेसे पैसे नसत. चार्ली आणि त्याची आई एका छोट्या माळ्यावरच्या खोलीत राहत असत. (सिडनी दूरू समुद्रावर होता.) हन्नाला लोखंडी पलंग होता. चार्ली खुर्चीवर झोपत असे. जी एका अंथरुणासारखी उघडत असे.





१९०३ मध्ये, चार्ली आपल्या आईची मनस्थिती बघून चिंतीत झाला. असं वाटत होतं की हना आपल्या अस्तित्वावरील पकड घालवून बसली आहे. तासोनतास न हलता, खिडकीच्या बाहेर बघत असे. घरात घाणेरड्या भांड्यांचा ढीग झाला होता. कधी कधी तिला काल्पनिक आवाज ऐकू येत असत.

एक दिवस, हन्ना एका घरातून दुसऱ्या घरात गेली आणि भेट म्हणून तिने लोकांना कोळश्याचे तुकडे भेट दिले.चार्लीला माहीत होतं त्याच्या आईला ज्या प्रकारच्या देखभालीची आवश्यकता होती ती द्यायला तो असमर्थ होता. मग आईला एक मैल दूर एका क्लिनिक मध्ये ठेवलं गेलं. तिथून डॉक्टरांनी हनाला मनोरुग्णालयात पाठवलं गेलं. थोडा काळ सोडला तर हनाने पुढची सतरा वर्षे वेगवेगळ्या दवाखान्यात घालवली.

चार्ली एकटा रिकाम्या घरात राहिला. चहा शिवाय कपाटात काही नव्हते. तो जेवणासाठी आणि काम मिळवण्यासाठी रस्त्यावर भटकत होता.तेव्हाच बातमी आली की त्याच्या मोठ्या भावाचे जहाज येत आहे. चार्ली म्हणतो, “जर माझा भाऊ सिडनी लंडनला आला नसता तर तो लंडनच्या गल्ली मध्ये चोर झाला असता.”

चार्लीचे फाटलेले कपडे आणि वाढलेले लांब घाणेरडे केस बघून सिडनी हैराण झाला. त्याने लवकरच त्याला गरम पाण्याने अंघोळ घातली. त्याचे केस कापले आणि एक नवीन सूट घेऊन दिला. मग त्याने आपली योजना सांगितली: सिडनी अभिनय करणार आहे. चार्लीने पण आपली कला आजमवायचे ठरवले.



हन्ना चॅपलिन (१८६५-१९२८)

१९०३ मध्ये हन्ना चॅपलिन आजारी झाल्यानंतर ती मानसिक आजारातून कधीच बरी झाली नाही. १९२१ मध्ये. कॅलिफोर्निया मध्ये मुलांनी समुद्र किनाऱ्यावर एक झोपडी बांधल्यानंतर सुद्धा त्यांना जीवनभर डॉक्टरांच्या देखरेखीखाली राहावे लागले.



१९२८ मध्ये ४३ व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला.


चार्लीला नेहमी आपल्या आईचा तो काळ आठवायला आवडत असे जेव्हा तिची तब्येत बरी होती. “मला असे वाटते की माझी आई जगातली सगळ्यात सुंदर महिला होती.त्याने एका रिपोर्टरला सांगितले, “मला आठवते की ती किती आकर्षक आणि चांगली होती.”

चॅपलिन भावंडांना लवकरच थिएटर मध्ये नोकरी मिळाली. चार्लीने शेरलॉक होम्सच्या नाटकात एका तरुण मुलाची भूमिका केली.काम मिळाल्याने तो रोमांचित झाला होता. पण जेव्हा त्याला स्क्रिप्ट मिळाले तेव्हा तो नाराज झाला, कारण शिक्षण कमी झाल्याने तो वाचू शकला नाही. म्हणून सिडनीने त्या ओळी त्याच्यासाठी परत परत वाचल्या. मग तीन दिवसात चार्लीने त्या तोंडपाठ केल्या.

आपल्या संपूर्ण जीवनभर चार्लीला कोणतेही नाटक तोंडपाठ लक्षात राहत असे.

शेरलॉक होम्स खूप लोकप्रिय झाले. चार्लीने दोन वर्षांपेक्षा अधिक काळ त्या नाटकात काम केले. शेवटी त्याने अभिनयाला आपल्या जीवनाचे ध्येय मानण्याचे ठरवले.

त्याला माहीत नव्हते की तो एक कॉमेडियन होईल.



अध्याय ३

स्लैपस्टिक कॉमेडी



फ्रेड कार्नो

१९०८ मध्ये चार्ली, फ्रेड कार्नोच्या ऑफिस मध्ये नोकरीच्या शोधात गेला. अभिनेता फ्रेड कार्नो एक धष्टपुष्ट माणूस होता आणि तो एक मोठे सिगार पित होता.तो हास्य कलाकाराच्या एका प्रसिद्ध समूहाचा मॅनेजर होता. स्लैपस्टिक कॉमेडीत चेहऱ्यावर ठोसे मारणे, पडणे, मारामारी, धक्का–बुक्की आदिचां समावेश होता.

चार्लीचा भाऊ सिडनीने आधीच कार्नो साठी काम केले होते. पण कार्नोला चार्ली अजिबातच योग्य वाटला नाही. चार्ली केवळ पाच फुट चार इंच उंच होता. त्याचे हात-पाय छोटे होते. "मला तो खूप लाजाळू वाटला," कार्नो म्हणाला.

"सतरा वर्षाचे वय खूप छोटे असते," कार्नोने चार्लीला म्हटले, " आणि तू तर त्यापेक्षाही लहान दिसतो."

चार्लीने डोकं हलवलं आणि म्हटलं की ही काही मोठी समस्या नाही. त्याला वाटलं की तो फक्त "मेकअपचा प्रश्न होता."

कार्नो त्या युवकाला दोन आठवडे संधी देवून बघायला तयार झाला.

आपल्या पहिल्या रात्रीच्या प्रयोगात चार्ली प्रेक्षकांच्या समोर पाठ करून मंचावर आला. लोकांनी त्याला श्रीमंत लोकांसारखी टोपी घातलेली पाहिलं. मग चार्ली समोर आला.

त्याने आपले नाक चमकणाऱ्या लाल रंगाने रंगवले होते.



प्रेक्षकांमध्ये हास्याची लहर पसरली.मग चार्लीने विदूषकाच्या करामती करायला सुरुवात केली. तो मंचावर फिरला आणि त्याने एका डम्बलवर ट्रिप केलं. जेव्हा त्याने आपल्या काठीला एक पंचिंग बॅगेवर मारलं तेव्हा तिने त्याच्या तोंडात मारलं.चार्ली डगमगला आणि परत वाकला आणि आपली काठी आपल्या डोक्यावर आपटली. प्रेक्षक हसून पुरेवाट झाली.

आठवड्याच्या शेवटपर्यंत चार्ली जेव्हा मंचावर येई तेव्हा प्रेक्षक टाळ्या वाजवू लागत. कार्नोला हे माहीत होते की त्याच्याजवळ एक विजेता आहे. त्याने चार्लीला साईन केले.

कार्नोच्या मूक कॉमेडियनने, पूर्ण इंग्लड आणि युरोपच्या संगीत हॉलमध्ये प्रदर्शन केले. चार्लीने आठवड्याच्या सातही दिवस, रात्री मध्ये तीन शो केले.

चार्ली पूर्ण दिवसभर तालीम करत असे. मंचावर, अडाणी खेळाडू किंवा नशेत असण्याचा अभिनय करत असे. पण त्याच्या करामतीना वास्तवात स्प्लिट-सेकंड टाइमिंगची गरज होती. जसे की कठीण नृत्यात करावे लागते. कारण स्लैपस्टिक कॉमेडीमध्ये नेहमी साखळी प्रतिसाद असतो. एक खेळाडू बुक्का मारतो, दुसरा त्यातून वाचतो, आणि तिसऱ्यालाच बुक्का बसतो.

अर्थात त्यात कधी कोणाला मार लागत नसे. पण मंचाच्या खाली बसणाऱ्या प्रेक्षकांना प्रत्येक नकली बुक्कावर हसू येत असे आणि ते टाळ्या वाजवत असत.





चार्ली लवकरच जंगली कलाबाज़ी करण्यात माहीर झाला. तो कठिणातला कठीण स्टंट सहज करू शकत असे. लवकरच कार्नोने चार्लीला साइड-रोलच्या ऐवजी मुख्य भूमिका दिल्या. १९१० च्या पानगळीमधल्या दौऱ्यात चार्लीला अमेरिकेत जाण्याची संधी मिळाली.



कार्नो मंडळी सप्टेंबर अखेरीस न्यूयॉर्क शहरात पोहचली. त्या रात्री, चार्ली ब्रॉडवेच्या रस्त्यावर चालला. चारीबाजुला थिएटरचे दिवे चमकत होते. त्याच्या डोक्यावर गगनचुंबी इमारती पसरलेल्या होत्या. चार्लीने विचार केला की अमेरिकेने त्याला एक सोनेरी काळ आणि रोमांचक संधी दिली होती.

मी इथे असायला हवं! त्याने स्वतःशी म्हटलं. त्यानंतर चार्लीने तिथेच राहायचं ठरवलं.

अमेरिकेने चार्लीला खूप प्रेम दिलं. त्याच्या अभिनयाबद्दल चांगले समीक्षण छापले : “चॅपलिन सगळ्यात अधिक हसवणारा आहे.” तो एक जन्मजात हास्य अभिनेता आहे.” त्या एका माणसामुळे थिएटर हसत असते.”.

मंचाच्या बाहेर, खरंतर, चार्ली शांत आणि गप्प राहत असे.त्याचा रुममेट स्टेन लॉरेलने म्हटले आहे की काही लोकांना चार्लीचा स्वभाव रुक्ष वाटत असे. (लॉरेल नंतर लॉरेल आणि हार्डी कॉमेडी मध्ये प्रसिद्ध झाला.) “पण तो तसा नव्हता,तो बिलकुल असा नव्हता. तो एक खूप लाजाळू माणूस होता.”



स्टेन लॉरेल

लांबच्या क्रॉस-कंट्री ट्रेनमध्ये, चार्ली एखाद्या पुस्तकात आपलं तोंड लपवत असे. त्याचे शालेय शिक्षण खूप लवकर संपले होते. आता चार्लीने वाचून-लिहून स्वतःला शिक्षित करण्याचे ठरवले होते. तो स्वतःचे स्वतः व्हायोलिन वाजवायला शिकला होता. सगळ्यात आधी चार्लीला व्हायोलिनच्या तारा उलटाव्या लागल्या. हेच एकमात्र कारण होते की तो डाव्या हाताने व्हायोलिन वाजवू शके..

१९१३ मध्ये एक दिवस चार्लीसाठी एक तार आली. तोपर्यंत चार्लीने कार्नोच्या बरोबर पाच वर्षे काढली होती. तारेतून त्याला कॅलिफोर्नियाला येण्याचे आणि सिनेमा करण्यासाठी आमंत्रण दिले होते.



ही एक मोठी जोखीम होती. चार्लीने नेहमी मंचावर अभिनय केला होता, तो कधी कॅमेरासमोर कधी उभा राहिला नव्हता. आणि फिल्म व्यवसाय अजून एकदम नवीन होता. अमेरिकेन मुव्ही थिएटरने आठ वर्षे आधी आपली दारे त्यासाठी उघडली होती.

“मला (कार्नो)ला सोडावे वाटत नव्हते,” चार्ली म्हणाला. “समजा, मी चांगलं प्रदर्शन केलं नाही? चिंतेची गरज नाही,चार्ली!”

अध्याय ४

मोठा पडदा

डिसेंबर १९१३ मध्ये,चार्ली कीस्टोन स्टूडियोत पोहचला. कीस्टोन स्टूडियो फक्त एक वर्ष जुना होता. कीस्टोन त्या अनेक छोट्या फिल्म स्टुडिओपैकी एक होता, जे कॅलिफोर्नियात उभे राहत होते. त्यातील सगळ्यात लोकप्रिय फिल्मे कीस्टोन पोलिसाच्या बाबत होती. तो एक पोलीस कर्मचाऱ्यांचा समुह होता. ते जंगली पद्धतीने पाठलाग करत इकडेतिकडे धावत असत. अभिनेत्यांचा एक गट प्रत्येक फिल्ममध्ये अभिनय करत असे.

कीस्टोन पोलीस आपल्या गस्त घालण्याच्या गाडीत




स्टूडियो, लॉस एंजिल्सच्या बाहेर पाच मैल दूर होता. चार्लीला तो स्टूडियो एका गोदामासारखे वाटे. शेत, लाकडाची झोपडी आणि दुकानं जवळ होती. त्याचबरोबर कॅक्टस आणि सेजब्रशची झाडं पण होती. स्टूडियो मध्ये अभिनेता गुंडासारखे वाटे.त्यानंतर चार्ली मागे फिरला आणि सरळ आपल्या हॉटेलवर परत जात असे.

चार्लीच्या कीस्टोनमध्ये परत येण्याला तीन दिवस लागले. एक विशाल मंच, वापस आने में तीन दिन लगे. एक विशाल मंच जो दोन ब्लॉक लांब होता त्याने त्याची लांबी अजून वाढवली.

एकाच वेळी तीन किंवा चार फिल्मचे वेगवेगळे शुटिंग चालू होते. सेट जवळजवळ उभे होते. एक लिविंग रूम, दूसरा जेल आणि तिसरा स्केटिंग रिंक असू शकतो. ते बघून चार्ली मोहित झाला.

स्टूडियोमध्ये खूप आरडाओरडा असे. सुतार, नवीन सेट उभारण्यासाठी लाकडं कापत असे आणि खिळे ठोकत असे. कॅमेरे हँडल फिरवले जात असत. दिग्दर्शक सूचना ओरडून देत असत. पण या आरडाओरडयाने बिलकुल फरक पडत नसे. कारण मूक फिल्म मध्ये काहीच आवाज नसत.



त्या काळी चित्रपट स्टूडिओत इलेक्ट्रिक लाइटिंगचा सुद्धा उपयोग केला जात नसे. जरी विजेवरचा प्रकाशाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता, पण कोणताही प्रकाश एवढा शक्तिशाली नव्हता की तो फिल्मला उजागर करू शकेल. त्याऐवजी कॅलिफोर्नियेतील तीव्र उन्हामुळे स्टुडीओ प्रकाशमान होत असत.

फिल्म कशी तयार होती हे बघण्यासाठी चार्लीचे काही दिवस गेले. काही गोष्टीचे आश्चर्य वाटले. त्याने दिग्दर्शकाला 'कट' ओरडतांना ऐकले.एका अभिनेत्रीने केवळ एका दरवाज्यावर थाप दिली. तेव्हा चार्लीला कळले की फिल्मे छोट्या छोट्या तुकड्यांनी तयार केली जाते.. दृश्यांचा क्रम चित्रित केले जाते आणि मग संपादन एका खोलीत केले जाते.

जेव्हा चार्ली आपली पहिल्या भूमिकेसाठी तयार झाला तेव्हा त्याला एक आश्चर्य वाटले. कीस्टोन, बिना स्क्रिप्टने फिल्म तयार करत असे. निर्देशक कहाणीच्या वेगवेगळ्या प्रसंगानुसार चित्रांकन करायला सुरुवात करत असे. अभिनेता आणि निर्देशक वेळेवर अधिकांश हास्य आणि मज़ा निर्माण करत असे. चार्लीने लिहलं,"थिएटर मध्ये मी रोज एकच गोष्ट परत परत करत असे. पण फिल्म मध्ये अधिक स्वातंत्र होते. चित्रपटात मला अधिक रोमांचक वाटत असे."

काही दिवसानंतर, चार्लीचा पहिला चित्रपट, *मेकिंग अ लिविंग* (१९१४) तयार झाली. त्या काळी चित्रपटाला "शॉर्ट्स" म्हटले जाई. तेव्हा चित्रपट एक लांब रील, किंवा जवळजवळ पंधरा मिनिटाचा असे. कहा जाता था. कीस्टोन स्टुडिओ नेहमी एका आठवड्यात तीन चित्रपट तयार करत असे.

मेकिंग अ लिविंगचे एका दृश्यामध्ये चार्ली डावीकडे



चार्लीचा दुसरा चित्रपटासाठी, कलाकार वेनिस, कॅलिफ़ोर्नियामध्ये मुलांची डर्बी-कार रेस मध्ये ड्राइव करायला जात असत. कीस्टोन चित्रपटामध्ये नेहमी स्टूडियोच्या आत शूट करण्याऐवजी "लोकेशन वर" चित्रित केले जात असे. उदाहरणा दाखल, एखाद्या फिल्मसाठी सडक वर परेड, आउटडोर संगीत कार्यक्रम, घौडदौड़, इथपर्यंत स्थानिक लागलेली आग पण शूट केली जात असे.



मैक सेनेट

वास्तविक जीवनातले दृश्य दिलचस्प असत, ते निर्माण करण्यासाठी त्याची किंमत काहीच नसे. मैक सेनेट, कीस्टोनचे प्रमुख होते. कलाकार व्हेनिस जाण्याच्या आधी त्यांनी चार्लीला एक पोषाख तयार करायला सांगितला. तो आपल्या मर्जीनुसार कपडे घालू शकत असे.

चार्लीने कीस्टोन्सच्या मोठ्या कॉस्ट्यूम रूम – जी एका जुन्या गोदामात होती. तिथे त्याने कपडे शोधले आणि जे त्याला आवडत होते ते त्याने त्याच्यासाठी घेतले. नंतर लिहले, “मला वाटत होते की सगळं काही विरोधाभास आहे : सैलसर पायजमा, तंग कोट, छोटी टोपी आणि मोठे मोठे बूट.”




कपड़े घातल्यानंतर, चार्लीने पायांवर पॅचवाले मोठे बूट उलटे घातले- डाव्या पायात उजवा बूट आणि उजव्या पायात डावा पाय.मग त्याने एक छोटी काळी मिशी चिटकवली. एक काठी घेतली आणि मग तो निघाला.



तेव्हा त्याला हे माहीत नव्हते, की त्याचे चित्रपट इतिहास निर्माण करतील.!

चार्लीने आत्ता-आत्ता एका प्रसिद्ध पात्र साकारले ज्याला "लिटिल ट्रॅम्प" च्या नावाने ओळखले जाते. *किड ऑटो रेस एट व्हेनिस* (१९१४) पहिली फिल्म होती ज्यात ट्रैम्प होता. दोन दिवसानंतर तो *माबेल्स स्ट्रेंज प्रिडिकामेन्ट* (१९१४) मध्ये दाखवली गेली, आणि त्या फिल्ममध्ये ट्रॅम्पचे मजेशीर व्यक्तित्वात जीव आला. फिल्म मध्ये एक महिलेच्या पायाचा त्याला धक्का बसतो आणी मग माफी मागण्यासाठी तो आपली टोपी उचलतो. मग तो एक थुंकण्याच्या पात्राशी टक्कर देतो आणि त्याला आपली टोपी घालतो. तो आपली काठी सुंदर पद्धतीने फिरवतो आणि आपली टोपी फेकून देतो.



जेव्हा चित्रपटाचे शूटिंग चालू होते तेव्हा चार्लीने ऐकले की कॅमरामॅन हसू लागला. लवकरच कीस्टोन क्रू चे अन्य लोक विदुषकाला बघण्यासाठी बाहेर आले. "ती वास्तवात एक खरी प्रशंसा होती," चार्लीने नंतर आठवणीत म्हटले, "मी तेव्हा हा निर्णय घेतला की मी हा पोषाख आणि ट्रॅम्पचे पात्र जिवंत ठेवेन, मग काहीही होऊ दे."

आपण ठरवल्यानुसार चार्लीने पुढच्या २२ वर्षात जवळजवळ सतरा चित्रपटात ट्रॅम्पची भूमिका साकारली. त्याने पडद्यावर येण्यापूर्वी सगळ्यात प्रसिद्ध पात्राची निर्मिती केली.

अध्याय ५

निर्देशक आणि स्टार

चित्रपटात चार्ली पूर्णपणे रमला. त्याने चित्रपट निर्मितीच्या सगळ्या गोष्टी शिकण्याची तयारी केली. एडिटिंग रूममध्ये चित्रपट कसा कापतात आणि मग कसे जोडतात? अभिनेता कॅमेरयाच्या किती जवळ फिरू शकतो? चित्रिण वेगाने किंवा हळू करण्यासाठी कॅमेरा कोणत्या गतीने फिरवला पाहिजे? हास्य प्रभावासाठी मूक चित्रपट वास्तविक जीवनाच्या तुलनेत वेगाने धावतांना दाखवत असत.

चार्ली पेक्षा अधिक मेहनत कोणी केली नसेल. "त्याला काम करावे वाटत होते - आणि जवळजवळ प्रत्येक वेळी काम करत असे." मैक सेनेट म्हणाला. "आम्ही आठ वाजता कामाला जात असू तर तो सात वाजता हजर असे. आम्ही पाच वाजता स्टूडियो सोडत असू...पण तो सहा वाजेपर्यंत तिथेच असे."

दुर्भाग्याने, चार्लीची शैली कधी-कधी कीस्टोनच्या शैलीला टकरत असे.त्यांची कॉमेडी गर्दी पकडण्यावर केंद्रित होती. पण चार्लीला वाटे की सगळ्यात चांगली कॉमेडी पात्रावर आधारित असली पाहिजे.तो आपल्या दृश्यात मजेदार वर्णने जोडू इच्छित असे, जे ट्रॅम्पच्या व्यक्तित्वाशी मेळ खात असे. पण निर्देशक, सुपरफास्ट वेगाला हळू करू इच्छित नव्हते. चार्लीचे काही मजेदार पात्रं, एडिटरूम मध्ये कचऱ्यात फेकले जात असत.



मग चार्लीने स्वतःच स्वतःचे चित्रपट लिहायला आणी दिग्दर्शित करण्याचे स्वप्न बघायला सुरुवात केली.

एका चित्रपटात अभिनेत्री माबेल नॉर्मंड निर्देशक होती. ती त्याकाळी मोठी स्टार होती.



माबेल नॉर्मंड

एका आउटडोर शूटिंगच्या वेळी, तिने चार्लीच्या कोणत्याही सूचना ऐकायला नकार दिला. शेवटी चार्ली निघून गेला आणि रागात रस्त्याच्या कडेला बसला.

मूक चित्रपट १८९४-१९२९


त्याकाळी मोठ्या रिळांवर चित्रपट करत असत.



कॅमरे हाताने फिरवले जात असत..



थिएटरमध्ये लाइव संगीत मूड सेट करत असत.



प्रोजेक्शनिस्ट, चित्रपट हाताने फिरवत असत.

"टाइटल कार्ड" पडद्यावर दाखवले जात असत.





चार्लीच्या बैठ्या संपाच्या बाबत ऐकून मैक सेनर्टला खूप राग आला. “तुला जेवढ सांगितलं तेवढंच कर,” तो चार्लीवर ओरडला. मग तो तिथून निघून गेला.

चार्लीला वाटले की त्याला काढून टाकले जाईल.पण त्याला आश्चर्य वाटले जेव्हा दुसऱ्या दिवशी सेनेटने त्याच्याकडे बघून मैत्रीपूर्ण स्मित केले आणि बोलला. त्याला आत्ताच इस्ट कोस्टहून कळले की चार्लीचे चित्रपट इतर सगळ्या कीस्टोन चित्रपटांना मागे टाकत आहे.लोक त्वरित त्या अजब ट्रॅम्प मुलाचे अजून चित्रपट बघू इच्छित होते.


चार्लीला खुश करण्यासाठी सेनेटला रस्ता शोधावा लागला. चार्लीने सुचवले की त्याला त्याचे चित्रपट स्वतः दिग्दर्शित करण्याची संधी मिळावी.हे सेनेटला धोक्याचे वाटले. कारण चार्ली अजून चित्रपटासाठी नवीन होता, तेव्हा चार्ली म्हणाला की तो त्याची जीवनभराची पुंजी दावावर लावेन. कीस्टोनला एका पैशाचे नुकसान होणार नाही.त्याचे डील झाले. तेव्हापासून चार्ली आपल्या चित्रपटाचा दिग्दर्शक आणि स्टार दोन्ही झाला.

चार्लीला ट्रॅम्पच्या बाबत विचार करायला आवडत असे. त्याने नेहमी काही वेगळे साकारले.गायीचे दूध कसे काढायचे माहीत नसतांना, ट्रॅम्प तिची शेपटी ओढतो. जेव्हा एका नळीने भिजला तेव्हा ट्रॅम्पने आपला कान खज्वला आणि त्याच्या तोंडातून पाणी येऊ लागले. आपल्या सावलीवर पडतांना, ट्रॅम्पने आपली टोपी तिच्यावर ठेवली.



त्याकाळी चित्रपटात एका सीटची किंमत केवळ एक निकल किंवा डाइम होती. जुने दुकानांना परिवर्तित करून, "निकलोडियन" नावाचे छोट्या थिएटरांमध्ये चित्रपट दाखवले जात असत. कधी कधी चार्ली एका अशा थिएटरमध्ये घुसत असे जिथं चित्रपट चालू असे. पण निळ्या डोळ्यांच्या त्या सुंदर युवकाला प्रेक्षकामधले कोणीही ओळखत नसे. तो फिल्ममधला चेष्टेखोर ट्रॅम्प सारखा बिलकुल दिसत नव्हता. चार्ली, पडद्यावर बघत नसे. त्याचे डोळे आणि कान प्रेक्षकांवर केंद्रित असत. ते कधी हसतात? कोणती गोष्टीमुळे ते जोरात हसतात? प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया चार्लीला आपल्या पुढच्या चित्रपटासाठी मदत करत असत.


दृश्यांच्या मध्ये, चार्ली "क्लॉग" नृत्य किंवा हेडस्टैंड करून फिल्म क्रू चे मनोरंजन करत असे. आपल्या कलाकारांना निर्देशित करण्यासाठी, चार्ली शूटिंगच्या आधी त्यांच्या सगळ्या अभिनयाचा अभ्यास करत असे.



निकलोडियन

पूर्वी सिनेमाघर "निकेलोडियन" होते. लाखो अप्रवासी बरोबर मजदूर वर्गाचे लोक तिथं फिल्म बघायला जात असत.

निकलोडियन जर्जर आणि गरीब हॉल होते. तिथं पाणी मिळत नसे, आणि प्रेक्षक लाकडी खुर्च्यांवर बसत असत. फक्त एका निकल मध्ये प्रेक्षकांना दहा ते पंधरा मिनिटे पर्यंत चालणारी काळी आणि पांढरी "शॉर्ट्स" फिल्म बघू शकत.



त्या काळात, फिल्म अभिनेताची नावे पडद्यावर दाखवत नसत. आता जनतेला हे जाणून घेण्याची उत्सुकता होती की मिशावाला हा मनुष्य कोण आहे? ट्रॅम्पचे मोठे कट-आउट पूर्ण अमेरिकेच्या चित्रपटगृहाच्या समोर लागू लागले. "चार्ली चॅपलिन. मी आज इथं आहे," साइनपोस्टवर लिहले जाई. चॅपलिन नावाकडे हजारो प्रेक्षक ओढले गेले.

कीस्टोनमध्ये एक वर्ष काढल्यावर चार्ली आता पुढे जाण्यास तयार होता.एक वर्ष काही मोठा काळ नव्हता. पण पहिल्याच वर्षी त्याने ३५ चित्रपट तयार केले.

अध्याय ६

यश

चार्लीने आपला भाऊ सिडनीला आपला बिजनेस मॅनेजर व्हायला सांगितले. ही एक शहाणपणाची गोष्ट झाली. सिडनीने चार्लीचा एस्सने फिल्म स्टूडिओ बरोबर एक करार केला. नवीन स्टूडिओने कीस्टोनपेक्षा तीसपट अधिक पैसे दिले.!

चार्लीने एका महिन्यात जवळजवळ एक ट्रॅम्प कॉमेडी तयार करायला सुरुवात केली. अधिकांश चित्रपट दोन रिळाइतके लांब होते. जे अर्धातास चालत. पण प्रत्येक सीन शूट करायला अनेक तास लागत असत. चार्ली अंतहीन रीटेक घेत असे.

द ट्रैम्प (१९१५) चे एका अभिनेत्याने स्टॅन लॉरेलला शिडीवाला प्रसंग पन्नास वेळा शूट करण्याच्या बाबत सांगितले होते. लॉरेलने सांगितले, "अभिनेत्यांना वाटले की तो सीन त्याने अजून एक वेळा करायला लावला तर त्याचे डोकं फिरेल.” पण चार्ली एक महान कलाकार होता. “त्याने नेहमी सर्वश्रेष्ठ काम केलं आणि त्याशिवाय काही करण्यास त्याने नकार दिला.”



पडद्यावर चार्लीला सगळं काही खूप सोप्पं वाटत असे. त्याच्या प्रशंसकांना त्याचा मजेशीर अंदाज खूप आवडे आणि त्यांनी त्याची खूप स्तुती केली. ट्रॅम्प हवेत एका पायाबरोबर चारी बाजूला पडत असे. त्याने आपल्या खांद्यावरून काडेपेटी फेकतो आणि मग आपल्या टाचेने लाथ मारत असे.

तो आपली टोपी मोठ्या बाहीच्या साहय्याने खाली सरकवत असे आणि मग न वाकता ती आपल्या डोक्यावरून काढत असे. ट्रॅम्प वेड लावणाऱ्या करामती करत असे-पुढे,मागे आणि तीन चतुर्थांश .खोडी करण्यापूर्वी तो आपली भुवई वाकवत असे,किंवा आपल्या मिशीने मुरका मारत असे.




सगळ्यात महत्वाचे म्हणजे ट्रॅम्प त्या छोट्या माणसासाठी उभा राहत असे जो कधी हार मानत नसे. *द ट्रॅम्प चा* प्रसिद्ध शेवट ज्यात आत्मा चमकत असे. ज्याने आत्ता-आत्ता आपली प्रियसी घालवली आहे..

एका शॉट मध्ये, तो एकटा लांब सुनसान रस्त्यावर येतो. एका काठीवर लटकलेले गाठोडे त्याच्या खांद्यावर लटकत असते.

अचानक, ट्रॅम्प खुश होऊन उडी मारतो आणि आपली काठी फिरवतो. जीवन त्याला खाली पाडण्याचा प्रयत्न करत असते पण ट्रॅम्प नेहमी स्वतः परत उठून उभा राहतो.

१९१६ मध्ये सिडनीने चार्लीला, न्यू यॉर्कला बोलावलं म्हणजे तो म्युचुअल फिल्म कॉरपोरेशन बरोबर एका नव्या करारावर सही करू शकेल. चार्ली तिथं जाण्यासाठी ट्रेन मध्ये बसला. अल्बुकर्क मध्ये एका स्टॉपवर त्याने बाहेर जय-जयकार ऐकला. ही बातमी सगळीकडे पसरली की चार्ली ट्रेन मध्ये आहे. त्याला बघण्यासाठी चाहत्यांची गर्दी झाली.





अमेरिकेत चॅपलिनची क्रेज होती. दुकानांमध्ये ट्रॅम्पचे बाहुले, बटण, कॉमिक बुक्स, टोपी आणि प्लेइंग कार्ड्स विकले जात होते. रहे ट्रॅम्पसारखे दिसणारे लोकांच्या स्पर्धा आयोजित केल्यात जात होत्या. युरोपात चार्ली खूप लवकर सुपरस्टार झाला कारण मूक चित्रपटांना दुसऱ्या कोणत्या भाषेत अनुवाद करण्याची गरज नव्हती. स्पेन मध्ये, लोकांनी चालिटोसचा जय-जयकार केला: फ्रान्स मध्ये, चेरियटचा; आणि इटलीत मध्ये, कार्लोचा



चार्लीची श्रीमंत होण्याची लालसा आता पूर्ण झाली होती. १९१६च्या त्याच्या करारामुळे १०,००० डॉलर प्रति आठवडा त्याला मिळत होता. यामुळे चार्ली अमेरिकेतला सगळ्यात अधिक वेतन घेणारा व्यक्ती झाला. कदाचित पूर्ण जगात. ही त्या काळातली गोष्ट आहे जेव्हा एखादी व्यक्ती १/४ डॉलर मध्ये एक डझन अंडी खरेदी करत असे.एक वर्षानंतर त्याने फर्स्ट नेशनलच्या करारावर सही केली ज्यामुळे चार्ली करोड़पती झाला! तो फाटक्या व्यक्ती पासून मोठा श्रीमंत झाला.

सिडनी चॅपलिन



सिडनी एक बालक होता तेव्हा त्याची आई, हन्नाने १८८५ मध्ये चार्ल्स चॅपलिन सीनियरशी लग्न केले होते. चार्ल्सने सिडनीला स्वीकारलं आणि त्याला आपलं नाव चॅपलिन दिलं. त्यानंतर चार वर्षांनंतर चार्लीचा जन्म झाला.

नाविक म्हणून काही वर्षे काढल्यावर सिडनी स्वतः एक चांगला अभिनेता झाला, जिथं त्याने आपल्या छोट्या भावाला नोकरी मिळवून दिली.चार्लीने नंतर आपल्या भावाचे उपकार फेडले जेव्हा त्याने सिडनीला कीस्टोन मध्ये अभिनेता म्हणून काम दिले. अभिनय चालूच ठेवून,सिडनीने चार्लीचा व्यावहारिक मॅनेजर म्हणून काम केले,जेव्हा त्याने अनेक फायदेशीर करारांवर हस्ताक्षर केले.


दोन्ही भाऊ आयुष्यभर एक दुसऱ्याच्या खूप जवळ होते.सिडनी स्थिर आणि देखभाल करणारा माणूस होता. आणि तो आपला छोटा भाऊ चार्लीवर सावधानपूर्वक नजर ठेवत असे.सिडनीने एकदा त्याला लिहले, “आईच्या आजारपणा नंतर जगात आपण दोघेच एकमेकांसाठी आहोत.”

सिडनीने आपले शेवटचे वर्षे युरोपमध्ये घालवले. जिथं त्याचे वयाच्या ८०व्या वर्षी निधन झाले.

अध्याय ७

एक नवीन स्टूडिओ

चार्ली पैशांच्या बाबत नेहमी सावध राहत असे. तो फक्त दोन खोल्यांच्या छोट्या घरात राहत असे. पण शेवटी त्याने खर्च करायला सुरुवात केली. त्याने आपली पहिली कर, सात सिटाची लोकोमोबाइल खरेदी केली आणि एक ड्रायव्हर ठेवला, जो त्याच्या बरोबर २० वर्षे होता. त्याने एक सचिव आणि स्वयंपाकी सुद्धा ठेवला.



त्याचे सामाजिक जीवन अजूनही शांत होते. शानदार हॉलीवुड पार्ट्या त्याला बिलकुल पसंत नव्हत्या. तो कधी दारू पित नसे आणि न कधी धुम्रपान करत असे.तो आपल्या घरात मजेत राहत असे.




डगलस फेयरबैंक्स

रॉबिन हुड चित्रपटातले दबंग अभिनेता डगलस फेयरबैंक्स त्याचे सगळ्यात चांगले मित्र होते. दोघेही एकमेकांच्या विरुद्ध होते. डगलस बहिर्मुख व्यक्ती होते, चार्ली अंतर्मुख व्यक्ती होते.पण दोघांमध्ये टेनिस बद्दल प्रेम आणि जिवंत विनोदी भावना होत्या.

चार्लीचा अधिकांश वेळ काम करण्यात जात असे. त्याने सगळ्या चित्रपटांचे लेखन, दिग्दर्शन, अभिनय आणि संपादन केले. तो आपली कास्टिंग स्वतःच करत असे.

ए डॉग्स लाइफ (१९१७) मध्ये, स्क्रैप्स नावाचा एक भटका कुत्रा ट्रैम्पचा मित्र होतो. चार्लीने निरीक्षण केले आणि भाग घेण्यासाठी अनेक शुद्ध वाणाचे कुत्रे आले. मग त्याने स्थानिक जातीचे मठ नावाचे एक छोटं कुत्रं मिळाले. प्रसन्न होऊन चार्लीने त्याला या चित्रपटात घेतले आणि त्याला आपल्या स्टुडिओच्या 'लोगो' म्हणून ठेवला.





त्यावर्षी, चार्लीने आपला स्टूडिओ तयार करायला सुरुवात केली. त्याने हॉलीवुडच्या मधोमध सनसेट बुलेवार्ड वर पाच एकर जमीन खरेदी केली. तिथं लिंबू आणि पिचची झाडं खूप फुलत होती. तिथं त्याने एक मोठी बाग केली आणि एक स्विमिंग पूल आणि टेनिस कोर्ट पण तयार केले. ड्रीम स्टूडिओ एक ब्रिटिश कॉटेज सारखे डिज़ाइन केला गेला. आत कार्यालय, मंच, ड्रेसिंग रूम, रीळ करण्याची जागा आणि निश्चित रूपात एक कटिंग रूम होती. १९१८ मध्ये, स्टूडिओ बांधून तयार झाला. चॅपलिनने ओल्या सिमेंटमध्ये पाय ठेवला आणि आपल्या पायाचे छाप तयार केले ते ट्रॅम्पचे मोठे बूट होते जे बाहेरच्या बाजूला होते..



यावेळे पर्यंत, अमेरिका प्रथम विश्व युद्धात लढत होती. चार्लीने ट्रॅम्पला वर्दी घालण्याचा निर्णय घेतला. छोटा मुलगा कर्तव्यासाठी बिलकुल योग्य नव्हता. *शोल्डर आर्म्स* (१९१८) मध्ये, एक कडक सार्जेंटने ट्रॅम्पला एका सरळ रेषेत परेड करण्याचा आदेश दिला. पण त्याचे पाय बाहेरच्या बाजूने पडतात. युद्धाच्या तयारीसाठी, ट्रॅम्प आपातकालीन पूर्ती साठी काही गोष्टी घेऊन जातो: कॉफ़ी-पॉट, पनीर आणि अंडी फेंटण्यासाठी रवी सारख्या गोष्टी.

जेव्हा चित्रपट जवळजवळ पूर्ण झाला, तेव्हा चार्ली घाबरला की तो फारसा मजेदार नाही. तो त्याला कचऱ्यात फेकणार होता. तेव्हा त्याचा मित्र डगलस फेयरबैंक्सने फुटेज बघितले आणि रडण्या ऐवजी तो हसू लागला. प्रेक्षकांनी ही जेव्हा असं केलं तेव्हा नंतर चार्लीने चित्रपट प्रदर्शित केला.

शोल्डर आर्म्स चित्रपट वेगाने हिट झाला. युद्धाहून परतलेले सैनिक खुश झाले जेव्हा ट्रैम्पने दुश्मनांना आपल्या मागच्या पायाने ती प्रसिद्ध किक मारली.

चार्ली अजूनही आनंदाने दोन खोल्यांच्या घरात राहत होता.मग *शोल्डर आर्म्स* प्रदर्शित झाल्यानंतर तीन दिवसांनतर अविवाहित चार्लीने, मिल्ड्रेड हैरिस नावाच्या एका युवा अभिनेत्रीशी लग्न करून सगळ्यांना आश्चर्यचकित केले. चार्लीने आपले पहिले घर खरेदी केले.दुर्दैवाने चार्ली आणि मिल्ड्रेड मध्ये समानता कमी होती.दोन वर्षानंतर, त्यांचे लग्न मोडले. मिल्ड्रेड हैरिस बरोबर चार्ली



१९१९ मध्ये, चार्लीने इतर हॉलीवुड नटांच्या बरोबरीने आपल्या चित्रपटाला फंड मिळवण्यासाठी आणि तो वितरित करण्यासाठी के कंपनी सुरु केली. यूनाइटेड आर्टिस्ट्स नावाची ही कंपनी आजही यशस्वी आहे.



एक निर्मात्याच्या रुपात, चार्ली जे हवं ते करू शकत असे. तो मोठा अधिक नाट्यपूर्ण चित्रपट करू इच्छित होता.

अध्याय ८

हिट चित्रपट

चार्ली, जैकी कूगन नावाच्या एका छोट्या मुलाला वाडेविलच्या मंचावर एक जिवंत नृत्य करतांना बघत होता. त्या मुलाने प्रेक्षकांना तसेच मंत्रमुग्ध केले,जसे त्या वयात चार्लीने केले होते. चार्लीच्या मनात एक नवीन विचार आला- एक अनाथ मुलाच्यावर चित्रपट करण्याचा. मुलं आधीही चित्रपटात आली होती, पण त्यांनी एखाद्या चित्रपटात प्रमुख भूमिका केलेली नव्हती.

जैकी कूगन



द किड (१९२१) चार्लीच्या इतर चित्रपटांपेक्षा हा चित्रपट वेगळा होता. एक निर्देशक म्हणून तो त्याचा पूर्ण लांबीचा पहिला चित्रपट होता. जो एक तास चालत असे. स्थिर दृष्यांशिवाय या चित्रपटाने एक कहाणी सांगितली. सगळ्यात महत्वाचे, यात कॉमेडी आणि नाट्य या दोन्हींचे मिश्रण होते. सुरुवातीचे शीर्षक असे होते.

हास्याबरोबर एक तसबीर – आणि कदाचित एक अश्रू सुद्धा



“याचा उपयोग होणार नाही,” एका प्रसिद्ध पटकथा लेखकाने चार्लीला म्हटले. “चित्रपट एकतर कॉमेडी असायला पाहिजे नाहीतर नाटक.तुम्ही त्यांचे मिश्रण करू शकत नाही.” पण नेहमीसारखे चार्लीने आपल्या स्वभावानुसार केले.

चित्रपटात जॅकी कूगनने केलेल्या बेघर मुलाचे संगोपन ट्रॅम्प करतांना दाखवला. आनंदी जोडी आपल्या समजेने वाचतात.


काहीवेळेस चार्लीचा राग इतर अभिनेत्यांवर कोसळत असे, पण हळूहळू त्याच्यात आणि त्याच्या सहकाऱ्यामध्ये एक नातं तयार झालं.चित्रपटाच्या उत्कर्ष बिंदुला एक सामाजिक कार्यकर्ता हालांकि चार्लीज़ का गुस्सा कभी-कभी अन्य जॅकीला ट्रॅम्पच्या बाही मधून बाहेर ओढून काढतो.पडद्यावर प्रथमच ट्रॅम्प रडतो. तो छतावर पळतो आणि जॅकीला वाचवण्यासाठी ट्रकवर चढतो.तोपर्यंत चित्रपटगृहात प्रत्येकाचे डोळे ओले झालेले असत.

द किड हा चित्रपट एक उत्कृष्ट कलाकृती म्हणून सम्मानित केली गेली. चार्लीच्या कलेने उत्कर्ष गाठला होता. लवकरच तो चित्रपट जगभर हिट झाला. फ्रान्सने चित्रपटाच्या उद्घाटन दिवसाला राष्ट्रीय सुट्टी घोषित केली.

इतिहासाने चार्लीला पुढच्या चित्रपटासाठी प्रेरित केले,जो अलास्का *गोल्ड रश च्या पार्श्वभूमीवर होती.* १८९०च्या दशकाच्या शेवटी, सोन्याच्या शोधात हजारो लोक अलास्काला गेले. *द गोल्ड रश* (१९२५) मध्ये, चार्लीने अलास्कासारखा दिसणारा सेट तयार करण्यासाठी खूप खर्च केला. तिथं दहा कर्कश कुत्रे आणि एक जिवंत पांढरे अस्वल आणले. नकली स्नोफील्ड तयार करण्यासाठी एक टन मीठ आणि पीठ ट्रक मध्ये टाकले गेले. बर्फाच्या दृश्यांसाठी कंफ़ेटीचे ट्रकलोड आणले गेले.



चित्रपटाचे उद्घाटन कॅलिफोर्नियाच्या सिएरा नेवादा पर्वतामध्ये शूट केलं गेलं. चार्लीने सोने खोदणाऱ्या व्यक्तीची भूमिका करण्यासाठी सहाशे अधिकचे लोक काम करण्यासाठी ठेवले. एक अविस्मरणीय दृश्यामध्ये ते एकटे पहाडावर एका रेषेत चढतात. मग पडद्यावर एक विचार चमकतो.



आणि तिथं एक ट्रॅम्प आहे, जो एका बर्फाच्या खडका फोडण्याचा प्रयत्न करत आहे. नक्कीच त्याची गोल टोपी त्याच्या डोक्यावर आहे आणि त्याची काठी त्याच्या हातात आहे. खूप आधी भुकेने तो मरत होता, ट्रॅम्प थैंक्सगिविंगच्या जेवणासाठी आपला बूट उकळत होता. ते तो एका पक्वान्ना सारखे वाढत आहे. तो दिखावा करतो की फावड्याचे पट्ट्या नुडल्स आहेत.



नंतर ट्रॅम्पची एक डिनर पार्टीत जेवण्याचे स्वप्नं आहे. त्याने दोन डिनर रोलमध्ये काटा घालण्याचे नाटक केले. आणि नाटक केलं की बुटांची जोडी नाच करत आहे. प्रेक्षकांना हे दृश्य एवढं आवडलं की काही चित्रपटगृहात चित्रपट थांबवून परत लावावा लागला. (हा ऑनलाइन बघण्यासाठी प्रमुख शब्द चॅपलिन फोर्क नृत्य शोधा.)

प्रशंसक आणि आलोचकांनी समान रूपात *द गोल्ड रश पसंत केला.* "चॅपलिन खूप प्रतिभाशाली आहे!" एक समीक्षकाने न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यूनमध्ये लिहले.



लिटा ग्रे


जेव्हा चार्लीचे फ़िल्मी जीवन फुलत होते,त्याचे गृहस्थी जीवन खराब होत होते. आता तो दुसऱ्या घटस्फोटाला तोंड देत होता. खरंतर आपली पत्नी लीरा ग्रे बरोबरचे त्याला दोन मुलं होतं. पण हे लग्न खूप दुःखद होते..

चार्ली आपल्या कामात इतका मग्न होता की त्याच्याजवळकुटुंबाला देण्यासाठी वेळ नसे. घरात एकटी राहिल्याने लिटा रागात होती. आणि तिने ही माहिती पत्रकारांना दिली. १९२७ मध्ये चॅपलिनचा घटस्फोट बातम्यांमध्ये पसरला. चार्लीचे वैयक्तिक जीवन आता त्याचे राहिले नव्हते. नंतर त्याच्या चारित्रावर हल्ला झाल्याने तो खूप त्रासला.

घटस्फोटाच्या काळात चार्ली *द सर्कस* (१९२८) चित्रित करत होता. ही त्याची तिसरी कलाकृती होती. ट्रम्प आपल्या पाठीवर माकडांसहित एका उंच तारेवर चालत आहे. उंच तारेवरचे चालणे चार्लीचे वास्तविक जीवन दाखवते.

अध्याय ९

ट्रम्प बाहेर पडतो.




१९२०च्या दशकाच्या शेवटी, मूक चित्रपटांचे जग पूर्णपणे उलटे झाले. आता चित्रपट आवाजासहित तयार होत होते.आवाजाचे चित्रपट लवकरच लोकांना आवडू लागले. प्रेक्षकांनी प्रथमच पडद्यावरच्या अभिनेत्यांचे आवाज ऐकले. दुर्दैवाने काहीचे उच्च उच्चार पातळ, आणि कर्कश होते. त्यांचे करीयर सपाट झाले.

चार्ली काय करणार? त्याला माहीत होते की तो एक शब्द बोलला, लिटिल ट्रैम्पची जादू संपून जाईन. म्हणून चार्लीने ही प्रवृत्ती कमी करण्याचा निर्णय घेतला. १९२८ मध्ये त्याने अजून एक मूक चित्रपट, *सिटी लाइट्स* (१९३१) वर काम केलं. प्रेक्षक अजूनही ट्रॅम्पचा आवाज ऐकू शकत नव्हते.पण त्याची उचकी ऐकू शकत होते. एका प्रफुल्लित करण्याऱ्या दृश्यात, ट्रम्प एक शिट्टी वाजवतो आणि जेव्हा तो शिट्टी वाजवत असे तेव्हा उचकीचा आवाज ऐकू येत असे.


मग लवकरच मूक चित्रपटांन संगीत त्या त्या चित्रपट गृहात पियानो वादकांच्या द्वारे आणि आयोजकांच्या द्वारे दिले जाऊ लागले.आता चार्ली स्वतः संगीत रचत असे. त्याने आपली गाणी स्वतः लिहायला सुरुवात केली. कदाचित ही प्रतिभा त्याला त्याच्या वडिलांकडून वारश्याने मिळाली असेल. चार्लीने कधी संगीत शिकले नाही, म्हणून तो फक्त धून गुणगुणत असे. आणि नोट्स कोणी लिहित असे. “मग चार्लीच्या क्रेडिटच्या लांब सूचीमध्ये संगीतकार" पण जोडले गेले.

चित्रपटगृह

१९२०च्या दशकात चित्रपटगृह फॅन्सी महाल झाले.स्वस्त "निकलोडियन“ च्या जागी संगमरमरचे खांब, भव्य लाकडी दरवाजे आणि गालिच्यांचे मोठे चित्रपटगृह तयार झाले. काहींना बांधण्यासाठी लाखोरुपये लागले.१९३० च्या दशकापर्यंत चित्रपटगृहात पाण्याची विक्री झाली, मग पॉपकॉर्नचा सुंगध चित्रपटाशी जोडला गेला.



ग्रूमनचे चीनी थिएटर, लॉस एंजिल्स



डेट्रॉइटमध्ये फॉक्स थिएटरच्या आत

सगळ्यात मोठा बदल तेव्हा झाला जेव्हा "टॉकीज“चे आगमन झाले. मूक चित्रपट काळातील पियानो आणि ऑर्गन वादक आणि आयोजकांना आपली नोकरी घालवावी लागली. त्यांच्या जागी विशाल स्पीकर आणि नवीन ध्वनी वाद्येलावली गेली.

सिटी लाइट्स १९३१ मध्ये बघण्यासाठी बाहेर आला.चित्रपट बघणारे मूक चित्रपट तिकिटे काढून बघतील का? चार्ली म्हणाला, हो! चित्रपट अजून एकदा ब्लॉकबस्टर झाला.

सिटी लाइट्स तयार करण्यासाठी चार्लीला तीन वर्षे लागली. आता एक ब्रेक घेण्याची वेळ होती- एक चांगला मोठा ब्रेक. चार्लीने १६ महिन्यासाठी हॉलीवुड सोडलं आणि तो यूरोप आणि आशिया फिरायला गेला.प्रवासाच्या दरम्यान त्याची भेट विंस्टन चर्चिल, महात्मा गांधी, एच. जी. वेल्स आणि जॉर्ज बर्नार्ड शॉ सारख्या महापुरुषांशी बेट झाली.तो एका जवळच्या ठिकाणी थांबला.






एक दिवस लंडनमध्ये, तो बाहेर पडला आणि आपल्या जुन्या शाळेत हैनवेलला गेला. जुन्या विटांची शाळेसारखी दिसत होती. जेव्हा तो सात वर्षांचा असतांना तिथे गेला होता. चार्ली एक सरप्राइज भेट देण्याच्या उद्देशाने आत गेला. भोजन कक्षात चारशे मुलांनी त्याला पाहताच वेडे झाले. चार्लीने आपल्या टोपीच्या टोकाला स्पर्श केला आणि ती त्याच्या डोक्यावरून जादूसारखी उडाली. त्याने आपले पाय बाहेर काढले आणि आपली प्रसिद्ध ट्रॅम्प वॉक केला. मुलं आनंदाने ओरडू लागले. चार्ली त्यांच्यातलाच एक होता. त्याने हे सिद्ध केले की गरिबी कोणालाही मागे ठेवू शकत नाही.

त्या रात्री आपल्या हॉटेलच्या खोलीत जाऊन चार्ली रडला. त्याच्या लहानपणाचे दिवस त्याला आठवले. त्याने लेखक थॉमस बर्कला सांगितले की हा प्रवास “त्याच्या जीवनातला सगळ्यात मोठा भावनात्मक अनुभव होता."

जेव्हा चार्ली आपल्या प्रवासातून परत आला, तेव्हा देशात महमंदी पसरली होती. लाखो लोकांनी आपला रोजगार घालवला होता किंवा कमी मजुरीवर नोकरी करायला ते मजबूर झाले होते. चार्लीला त्यांच्याप्रति सहानुभूती वाटत होती. त्याने एका संदेशासहित एक कॉमेडी करण्याचा निर्णय घेतला. एकदा परत त्याने एक मूक चित्रपट करण्याची हिंमत केली. पण तो त्याचा शेवटचा चित्रपट होता.

मॉडर्न टाइम्स (१९३६) मध्ये ट्रॅम्पला एका फॅक्टरीच्या असेम्ब्ली लाईनवर काम करतांना दाखवलं गेलं. लंडनमध्ये एका तरुणाच्या रुपात चार्लीने एका प्रिंटरसाठी काम केलं. प्लांटमध्ये एक विशाल प्रिंटिंग प्रेस दाखवला गेला. मोठे मशीन चालतांना बघून चार्ली घाबरला, “मला वाटलं की ते मला खाऊन टाकेन.” आधुनिक काळात चार्लीची ही आठवण लोकांना हसू आणते. एक राक्षस मशीनचे दात ट्रॅम्पला पकडतात आणि गियर त्याला चावतात.



प्रफुल्लित करणाऱ्या दृश्यातून एक गंभीर संदेशसुद्धा होता. चॅपलिनला चिंता होती की कारखान्याच्या कर्मचारया बरोबर कधी कधी मशीन सारखा व्यवहार केला जात असे, माणसांसारखा नाही.

चित्रपटातील शेवटच्या दृश्यामध्ये, ट्रॅम्प आणि त्याची प्रेमिकेने आपलं सर्वकाही घालवून बसतात. पण ट्रॅम्प तिला खुश करण्यासाठी आणि तिला हसवण्याचा प्रयत्न करे. मग जोडी हातातहात घालून दूर निघून गेले.

त्याबरोबर लिटिल ट्रॅम्प चित्रपटातील जगातून गायब होतो.

चार्लीचे सगळ्यात लोकप्रिय गीत

चार्लीने *मॉडर्न टाइम्स* चे थीम गाण्यासाठी एक हृदयाला स्पर्श करणारी धून रचली होती. वर्षा नंतर, जॉन टर्नर आणि जेफ्री पार्सन्सने त्यात शब्द जोड़ले. हे 'हास्य' नावाचे एक गाणे हिट झाले. गाण्याच्या शब्दात लिटिल ट्रॅम्पची सकारात्मक, जिंकणारया भावनेला पकडले होते. "हास जरी तुझे मन दुखत असले तरी. जरी तुझे हृदय भंगले असले तरी हास." अनेक महान गायकांना 'स्माईल 'रेकॉर्ड केले आहे. ज्यात नेट किंग कोल, माइकल जैक्सन आणि बारबरा स्ट्रीसंड सामील होते.



अध्याय १०

निर्वासन (एक्सआईल)

१९३९मध्ये द्वितीय विश्व युद्ध सुरु झाले तेव्हा जर्मन हुकुमशहा अडोल्फ हिटलरने पोलैंड वर आक्रमण सुरु केले. हिटलर आणि चार्ली फक्त चार दिवसांनी मोठे-छोटे होते. दोन माणसं काही मर्यादेपर्यंत एकमेकांसारखे दिसत. काही लोकांच्या म्हणण्यानुसार हिटलरने आपल्या मिशांचे डिझाईन मुद्दाम तसे ठेवले होते कारण लिटिल ट्रैम्पसारखा त्याला लोकप्रिय व्हायचे होते.




अडॉल्फ हिटलर

खरतरं, हिटलरने ही गोष्ट स्पष्ट केली होती की तो चैपलिनचा तिरस्कार करतो. हिटलरने विचार केला की चॅपलिन यहूदी होता, आणि हिटलर सगळ्या यहुदीचा तिरस्कार करत होता. "माझ्या कडे सम्मान नाही," चार्ली म्हणाला.

१९३९ मध्ये, चार्लीने भयानक हुकुमशहाचा उपहास करण्यासाठी एक चित्रपट सुरु केला. *द ग्रेट डिक्टेटर* (१९४०) त्यांची पहिली बोली चित्रपट होता. चार्लीने यात दोन भूमिका केल्या. एक होती हिटलर सारखा हुकुमशहा एडीनॉयड हिंकेलची. आणि दूसरी भूमिका एक शांत आणि प्रतिष्ठित यहूदी न्हाव्याची .

चार्लीने दाखवलं की हिटलर वास्तवात कसा होता - एक शेख़ी मिरवणारा, सत्तेचा भुकेला, आणि वेडा. एका प्रसिद्ध दृश्यात हुकुमशहा एका गोल फुग्याबरोबर नाच करतो. तो एक हास्य बॅलेमध्ये उडी घेतो आणि रडतो. मग त्याच्या चेहऱ्यावर फुगा फुटतो.



जर्मनी सोडून, *ग्रेट डिक्टेटर ला* एक मोठे यश मिळाले. हिटलरने तो चित्रपट दाखवू दिली नाही. न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यूनच्या एका समीक्षकाने लिहले, “त्या चित्रपटामुळे जग वेडं झालं,ती एक सटीक कॉमिक कमेंट्री होती." चार्लीने यूरोपमध्ये युद्ध सुरु होण्याच्या आधी के आठवड्यानंतर चित्रपट सुरु केला. त्यानंतर त्याने म्हटले की जर त्याने हा चित्रपट केला नसता तर ते येणाऱ्या युद्धाची भयानकता समजू शकले नसते.

चित्रपटाची यशाशिवाय चार्लीसाठी १९४० चे दशक खूप कठीण वर्ष होते. त्याची पहिली फिल्म बॉक्स ऑफिस चित्रपट फ्लॉप झाला. ती एक मर्डर मिस्ट्री होती ज्याचे नाव *मॉन्सियोर वर्दौक्स* (१९४७) होते. पण यापेक्षाही वाईट गोष्ट म्हणजे चार्लीला अमेरिकेच्या बाहेर काढण्याच्या गोष्टी सुरु झाल्या.लोकांना तो कम्युनिस्ट असल्याचा संशय होता.

द्वितीय विश्व युद्ध समाप्त झाल्यावर, अमेरिका आणि सोवियत संघामध्ये खूप ताण होता. त्या दोन महाशक्ती होत्या - एकमात्र राष्ट्र जे परमाणु बॉम्ब पाडण्यास सक्षम होते.





खरंतर त्याकाळात प्रत्यक्ष लढाई लढली गेली नाही, या काळाला शीत युद्ध म्हटले जाऊ लागले. सोव्हिएत संघ एक साम्यवादी राष्ट्र होते. तिथं केवळ एकच राजनैतिक दल होते, आणि तिथं लोकांना आपलं असं स्वातंत्र्य नव्हतं.

अमेरिकेत, दहशत पसरली होती की कम्युनिस्ट सत्ता ताब्यात घेण्यासाठी देशात गुप्तपणे काम करत आहेत. अमेरिकन सरकारने "गैर-अमेरिकी कामं " करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर संशय घेऊन कार्यवाही केली. (याचा अर्थ होता की ती व्यक्ती एक कम्युनिस्ट आहे.) सुनावणी एक "विच हंट" सारखी झाली. लोकांनी आपली नोकरी घालवली आणि त्यांना इतर कोणतंही काम मिळणे अशक्य होते. हॉलीवुड फिल्म इंडस्ट्रीचे लोक नेहमी यागोष्टीचे शिकार होत असत.

पण चार्ली चॅपलिनवर निशाण का साधले गेले? अनेक लोकांनी विचार केला की त्यांचे राजनैतिक विचार खूप कट्टर आहेत. त्याबरोबरच त्यांना कधीही अमेरिकन नागरिक होण्याची इच्छा नव्हती. जेव्हा त्यांना विचारले गेले,त्याचे कारण तेव्हा त्यांनी उत्तर दिले, “मी जगाचा नागरिक आहे.” चार्ली तोपर्यंत तीन घटस्फोट घेऊन चुकला होता. प्रत्येक वेळी प्रेसने त्याला जगासमोर आणलं होतं. त्यात चार्लीची प्रतिमा खराब झाली होती.

चार्लीने दृढ़पणे म्हटले की तो कम्युनिस्ट नव्हता. तसं पाहिलं तर एफबीआईने चॅपलिन वर दोन हजार रुपयांपेक्षा अधिक पानांची फाइल जमा केली, पण त्याच्या विरोधात कोणताही पुरावा मिळाला नाही.

या साऱ्या उलथापालथीत चार्लीला ॲना ओ'नील बद्दल प्रेम वाटू लागले. ती प्रसिद्ध नाटककार यूजीन ओ'नील यांची मुलगी होती. ती एक बुद्धिमान, सुंदर महिला होती. आणि तिलाही चार्लीबद्दल प्रेम वाटू लागले. त्यांनी जून १९४३ मध्ये लग्न केले. तीन असफल विवाहा नंतर, चार्लीला शेवटी दीर्घकाळ टिकणारे आणि स्थिर प्रेम मिळाले.त्यांना आठ मुलं झाली.



ओना ओ'नील आपले वडील
यूजीन ओ'नीलो बरोबर



१९५२ मध्ये, चार्ली ॲना अप्ळूं मुलाच्या सोबत युरोपला रवाना झाले. चार्लीची तिसरी बोलका चित्रपट, *लाइमलाइट* (१९५२) चे उद्घाटनासाठी लंडनला जात होते. (अधिकांश अमेरिकी थिएटर मालकांनी चित्रपटावर बंदी घातली होती.)

समुद्रात दोन दिवसानंतर चार्लीला अमेरिकन सरकार कडून संदेश आला की तो देशात तोपर्यंत प्रवेश करू शकत नाही जोपर्यंत स्वतः एक प्रामाणिक नागरिक म्हणून स्वतःला शाबित करत नाही. चार्लीला खूप राग आला, त्यांनी दत्तक घेतलाला देशही त्यांच्या हल्ला करत होता. मग त्यांनी कायमसंपूर्ण अमेरिका सोडण्याचा निर्णय घेतला.

चैप्लिन यूरोपमध्ये काही काळ फिरला आणि लक्झरी हॉटेलमध्ये राहिला. मग १९५२ मध्ये चार्ली आणि ॲना यांनी स्विझर्लंड येथे एक खूप छान इस्टेट खरेदी केली. तिथून स्विस आल्प्स आणि झगमगता जिनेव्हा तलावाचे दृश्य दिसत असे. चार्लीने आपली शेवटची पंचवीस वर्षे आनंदाने तिथे घालवली.




परिवार ऐशोआरामात तिथे राहत होता. १७०० च्या दशकात बांधलेल्या १९ खोल्यांची देखभाल करण्यासाठी नोकरांची मोठी फौज होती. ३५ एकराची संपत्तीत राखणदार आणि माळी सुद्धा होते.

स्विझर्लंडमध्ये चार्ली व्यग्र होता. त्यांनी आपल्या मूक चित्रपटांचे मूळ संगीत लिहले. ते एकमेव अशी व्यक्ती होते ज्यांनी आपल्या चित्रपटासाठी संगीत लिहणे, अभिनय करणे, निर्देशन करणे, कास्ट करणे, निर्माण करणे या सगळ्या गोष्टी केल्या. हे करणारे ते एकमेव निर्माते होते. त्यांनी आपले मागचे दोन चित्रपट *ए किंग इन न्यूयॉर्क* (१९५७) आणि *ए काउंटेस फ्रॉम हॉन्ग कॉन्ग* (१९६७) पण तयार केले. कोणताही चित्रपट त्यांच्या मागच्या चित्रपटासारखा लोकप्रिय झाला नाही.

जीवनाच्या या शेवटच्या पाडावावर ते कौटुंबिक जीवनात पहिल्या पेक्षा अधिक खुश ओटे. त्यांच्या सगळ्यात छोट्या मुलाचा जन्म झाला तेव्हा ते ७३ वर्षाचे होते. त्यांचा मोठा मुलगा, चार्ल्स जूनियर आणि भाऊ सिडनीही भेटायला आले. चार्लीने आपले जुने चित्रपट आपल्या मुलांबरोबर हवेलीच्या मोठ्या हॉल मध्ये बघायला आवडत असे. चार्ली पेक्षा जोरात कोणीच हसले नाही.

अध्याय ११

अंतिम नमस्कार



स्विस पहाडामध्ये फिरतांना चार्लीने आपल्या लांबलचक आणि पूर्ण जीवनाबद्दल विचार केला.१९६४ मध्ये त्यांनी सगळं काही कागदावर लिहले.:"वर्कहॉउस" मधील दुःखभरे दिवसांपासून चॅपलिनचे गौरवाच्या दिवसापर्यंत.त्या मूक अभिनेत्याने पाचशे पानं लिहली. त्या पुस्तकाचा अनेक भाषात अनुवाद झाला.आणि जगात पुस्तक बेस्टसेलर झाले.

आता चार्लीचे कुरळे केस एकदम पांढरे झाले होते. तो स्विमिंग करून आणि टेनिस खेळून एकदम फिट राहत असे. तो आपल्या मुलांबरोबर लॉनवर फुटबॉल खेळत असे. शेवटी सत्तरच्या दशकात त्याचे सुंदर शरीर थकू लागले. एक वेताची काठी जी त्यांची जुनी प्रसिद्ध आधार होती, आता चालण्यासाठी तिची मदत घ्यावी लागत होती.


यावेळे पर्यंत, अमेरिकेत चार्लीच्या प्रती नरम भावना झाल्या होत्या. संदिग्ध कम्युनिस्टांची जुनी भीती कमी झाली होती. चित्रपट इतिहासकार चार्लीची चित्रपटातील अग्रणी भूमिकेचे कौतुक करत होते. त्यांच्या लक्षात आले चार्लीची कॉमेडी प्रत्येक काळात किती उपयुक्त आहे. “चित्रपट इतिहासातील सगळ्या महान अभिनेता त्याच्याशिवाय कोण होता?” १९९५ च्या एका सर्वेक्षणात चित्रपट समीक्षकांनी विचारले.त्यांनी चार्ली चैपलिनला एक नंबर दिला.

१९७२ मध्ये, त्यांना एक विशेष अकादमी पुरस्कार दिला गेला. त्यांनी “चल चित्रपटांना त्या काळात कलेचे रूप दिले होते. ती त्यांची महान भूमिका होती.

आपला विशेष ऑस्कर प्राप्त करण्यासाठी चार्लीने अमेरिकेसाठी उड्डाण केले.वीस वर्षात तो पहिल्यांदा अमेरिकेत जात होता. *द किड चे* स्क्रीनिंगसाठी त्याचा पहिला मुक्काम न्यूयॉर्क सिटी होता.

मग ते हॉलीवुडला पण गेले.तेव्हा त्यांनी *द किड चे* आपला तरुण सहकारी जैकी कूगन ला बघितले तेव्हा चार्ली स्फुंदून स्फुंदून रडू लागले. मूक चित्रपटाने चांगल्या वाईट दिवसांच्या आठवणी ताज्या केल्या.

चार्ली या गोष्टीला घाबरत होते की ऑस्कर पुरुस्काराच्या दरम्यान प्रेक्षकांची काय प्रतिक्रिया असील. पण त्यांची भीती लवकरच दूर झाली. जेव्हा चार्ली मंचावर आले, तेव्हा प्रेक्षकांनी त्यांच्यासाठी उभे राहून बारा मिनिटापर्यंत टाळ्या वाजवल्या.. "ओह, तुम्ही अद्‌भुत, प्रेमळ लोक आहात," ते प्रेक्षकांना म्हणाले. चार्लीच्या चेहऱ्यावरून अश्रू वाहत होते.



१९७५ मध्ये महाराणी एलिजाबेथ द्‌वितीय यांनी इंग्लैंडच्या मुलाला नाइट ही पदवी दिली. एका छोट्या गल्लीतला मुलगा आता सर चार्ली चैपलिन होता.

दोन वर्षानंतर, ख्रिसमसच्या दिवशी चैपलिनचा स्विझर्लंडच्या घरी मृत्यू झाला. त्यांची प्रेमळ ॲना आणि मुलं त्यांच्याभोवती जमा झाले होते. हे एक उल्लेखनीय जीवनाचे अंतिम दृश्य होते. ते अठ्ठांशी वर्षाचे होते.

२०१६ मध्ये चार्लीच्या एकशे विसावा वाढदिवस त्याचा स्टारडम आश्चर्यजनक वाढला झाली म्हणून साजरा करण्यात आला. त्याच्या वाढदिवसाचा सन्मान करण्यासाठी चार्ली आणि ॲनाच्या स्विस हवेली मध्ये एक चॅपलिन संग्रहालय उघडले गेले.

सगळीकडे चार्लीची प्रशंसा होत होती. पण चार्लीने एकदा स्वतःच म्हटले होते, “मी फक्त एक छोटासा निकेल कॉमेडियन आहे जो लोकांना हसवण्याचा प्रयत्न करतो आहे.”

चार्ली चॅपलिनचा जीवनकाळ

१८८९ चार्ल्स स्पेंसर चैपलिनचा जन्म १६ एप्रिल लंडनमध्ये झाला.

१८९६ अनाथ आणि निराश्रित मुलांसाठी असलेल्या हैनवेल स्कूलमध्ये पाठवले.

१९०१ त्यांचे वडील, चार्ल्स चैपलिन सीनियर, अडतीस वर्षाचे असतांना दारू पिण्यामुळे मरण पावले.

१९०३ शर्लक होम्समध्ये प्रदर्शन

१९०८ शोमैन फ्रेड कार्नोने चार्लीला त्यांच्या पैंटोमाइम कॉमेडीत अभिनय करण्याचे काम दिले.

१९१३ कीस्टोन स्टूडियो बरोबर संकेत

१९१४ ने लिटिल ट्रैम्प पात्राचा शोध लागला.

१९१५ एस्सने फिल्म निर्माण कंपनीसाठी ट्रैम्पचे काम सुरू केले.

१९१८ *शोल्डर आर्म्स* एक स्मैश हिट झाली.

१९२१ *द किड त्यांची पहिला चरित्र* चित्रपट होता, जो समीक्षेसाठी प्रदर्शित केला होता.

१९२४ *द गोल्ड रश* (१९२५) चे शूटिंग सुरू झाले.

१९३१ *सिटी लाइट्सचे* विश्‍व प्रीमियर

१९३६ *मॉडर्न टाइम्स,* एक कारखाण्यात मॉस प्रोडक्शन लाइनच्या बाबत.

१९४० *द ग्रेट डिक्टेटर,* एक द्वितीय महायुद्धावर व्यंग्य

१९४३ ॲना ओ'नीलशी लागण, त्यांना आठ मुलं झाली.

१९७२ त्यांचा अमेरिकी व्हिसा रद्द केला गेला.

१९७२ परिवाराला स्विझर्लंड मध्ये नेले.

१९७२ एक विशेष अकादमी पुरस्कार प्राप्त झाला.

१९७५ महाराणी एलिजाबेथ द्वितीय यांनी चार्लीला "सर“ या पदवीने सन्मानित केले.

१९७७ ख्रिसमसच्या दिवशी अठ्ठांशी वर्षी त्यांचा घरातच मृत्यू झाला.

विश्वाच्या सनावळी

१९00 - एस्केप कलाकार हैरी हौदिनीने प्रथम लंडनच्या संगीत हॉलमध्ये कार्यक्रम केला.

१९११ - हॉलीवुड, कॅलिफोर्निया मध्ये अनेक चित्रपट स्टुडीओ निघाले.

१९१३ - हेनरी फोर्डने फोर्ड कारचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी पहिली चालणारी चलती असेंबली लाइन स्थापन केली.

१९१७ - अमेरिकेने प्रथम विश्व युद्धात भाग घेतला (१९१४-१९१८)

१९२७ - जैज़ सिंगरने "टॉकिंग पिक्चर्स"च्या नव्या युगाला सुरुवात

१९२९ - हॉलीवुड मध्ये पहिला अकादमी पुरस्कार समारोह आयोजित केला गेला.

१९३० - इंग्लैंडने गरीबाच्या सहाय्याच्या कार्यक्रमासाठी "वर्कहाउस" स्थापित केले.

१९३२ - वॉल्ट डिस्नेने आपली पहिली रंगीत फिल्म तयार केली, एक छोटं कार्टून ज्याचे नाव होते "फ्लावर्स एंड ट्रीज"

१९४१ - पर्ल हार्बरवर जपान बॉम्बिंग नंतर अमेरिकेने द्वितीय विश्व युद्ध (१९३९-१९४५) मध्ये प्रवेश केला.

१९५० – कोरियन युद्ध तेव्हा सुरु झाले जेव्हा कम्युनिस्ट उत्तर कोरियाने दक्षिण कोरिया वर आक्रमण केले.

१९५२ - राजकुमारी एलिजाबेथला इंग्लडची महाराणी एलिजाबेथ द्वितीयचा मुकुट घातला गेला.

१९५४ - सीनेटर जोसेफ मैकार्थीने कम्युनिस्ट असल्याचा आरोपाखाली अमेरिकी नागरिक म्हणून तपास करून सार्वजनिक सुनावणी केली.

१९६१ - डिस्नेचा चित्रपट “१०१ दलमशंस" एक प्रमुख हिट चित्रपट झाला.

१९६३ - मार्टिन लूथर किंग जूनियरने मार्चमध्ये वॅशिंगटन फॉर जॉब्स एंड फ्रीडम वर आपले प्रसिद्ध "आई हैव ए ड्रीम" भाषण दिलं.

१९७४ - रिचर्ड निक्सनने अमेरिकेचे राष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला.